# संपदा सहकारी बँक लिमिटेड, पुणे

**मुख्य कार्यालय :**७१७, बुधवार पेठ, गणेश रोड, पुणे ४११ ००२
**नोंदणी क्रमांक :**पी.एन्.ए./बी.एन्.के./२३१, दिनांक ३१/०५/१९७४
**रिझर्व्ह बँक अनुप्राप्ती क्रमांक :** यु.बी.डी.एम्.ए.एच्.१६१७ पी, दिनांक ०८/०८/१९९८
**दूरध्वनी क्रमांक :** ०२०-४०३९४०३८, ४०३९४०३९
**E-mail :** headoffice@sampadabank.com, **Website :** www.sampadabank.com

## ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
**(फक्त सभासदांसाठी)**

संपदा सहकारी बँक लि., पुणे या बँकेच्या सर्व सभासद बंधू भगिनींना विनंतीपूर्वक कळविण्यात येत आहे की, बँकेची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक २८ जून, २०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता, 'गणेश सभागृह', मा. स. गोळवलकर गुरुजी विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे ४११०३० येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती. सभेत खालील विषयांचा विचार केला जाईल व त्यावर निर्णय घेतले जातील.

### सभेपुढील विषय

**१)** दिनांक २३ जून, २०२४ रोजी झालेल्या ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

**२)** सन २०२४-२०२५ या सहकारी वर्षातील बँकेच्या कामकाजाच्या मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या अहवालाची माहिती घेणे व वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेले आणि मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले दिनांक ३१/०३/२०२५ अखेरचे नफा तोटा पत्रक व ताळेबंद स्वीकृत करणे.

**३)** वैधानिक लेखापरिक्षकांच्या आर्थिक वर्ष २०२४-२०२५ च्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

**४)** सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

**५)** मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४-२०२५ च्या नफा वाटणीस मान्यता देणे.

**६)** मा. संचालक मंडळाने २०२५-२०२६ या सालासाठी सुचविलेले व शिफारस केलेले बँकेच्या उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक संमत करणे व ज्या बाबींवर गतवर्षीच्या अंदाजपत्रकातील अंदाजापेक्षा जास्त खर्च झाला आहे, त्या खर्चास मान्यता देणे.(परिशिष्ट क)

**७)** सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या व्यवसायवृध्दी आराखड्याची नोंद घेणे.

**८)** मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या बँकेच्या पोटनियमांमधील दुरुस्तीस मंजुरी देणे (परिशिष्ट ड)

**९)** बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडून दिनांक ३१/०३/२०२५ अखेर येणे असलेल्या कर्जाची सहकारी कायदा कलम ७५(२) नुसार माहिती घेणे (परिशिष्ट ब)

**१०)** सन २०२४-२०२५ मध्ये एकरकमी सामोपचार कर्जपरतफेड योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या प्रस्तावांची नोंद घेणे.

**११)** म.स.संस्था नियम १९६१ च्या नियम ४९ अन्वये वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार अनुत्पादित कर्जखात्यांची नांवे बाकी वसुलीचा हक्क अबाधित ठेवून निरस्त (Write Off) करण्यास मान्यता देणे.

**१२)** सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मान्यतेस अधीन राहून मे. एस. आर. पंडित ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंटस् यांच्या नियुक्तीची नोंद घेणे.

**१३)** सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्ती करणेस व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देण्याबाबत नोंद घेणे.

**१४)** मा. अध्यक्षांचे अनुज्ञेने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**मा. संचालक मंडळाचे आज्ञेवरुन**
**गिरीश गणेश सरदेशपांडे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**दिनांक : ०५ जून, २०२५**

**टीप :**

१) गणसंख्येअभावी वार्षिक सर्वसाधारण सभा तहकूब झाल्यास, सभा सकाळी ठीक १०.३० वाजता घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्या नसली तरी वरील विषयांचा विचार होईल व निर्णय घेतले जातील.

२) वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या शाखेतून अथवा मुख्य कार्यालयातून दिनांक १३/०६/२०२५ पासून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सभासदांनी घेऊन जावी, अशी विनंती आहे.

३) सभेचे कामकाज योग्य वेळेत पूर्ण व्हावे, या दृष्टीने अहवाल व ताळेबंदाविषयी किंवा नोटीशीतील विषयासंबंधी **सभासदांना काही माहिती व प्रश्न विचारावयाचे असल्यास, त्यांनी बुधवार, दिनांक २५/०६/२०२५ रोजी संध्याकाळी ६.३० वाजेपर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लिखित स्वरुपात आणून द्यावेत, म्हणजे माहिती देणे सोयीचे जाईल.**

४) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेतील विषयांसंबंधीची सर्व अनुषंगिक कागदपत्रे, बँकेच्या मुख्य कार्यालयात, बँकेच्या वेळांत सभासदांना पाहावयास मिळतील.

५) बँकेचा संक्षिप्त ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या वेबसाईटवर दिनांक १३/०६/२०२५ पासून उपलब्ध आहे.

६) सर्व सभासदांना विनंती की, त्यांनी आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्त्याची नोंद बँकेच्या दप्तरी करण्यासाठी बँकेशी संपर्क साधावा.

७) ज्या सभासदांनी आपली के.वाय.सी. कागदपत्रे बँकेत सादर केली नसतील, त्यांनी ती त्वरीत सादर करावीत, ही विनंती.

८) **ज्या सभासदांच्या पाल्यांना इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत ८५ % पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत, तसेच, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात विशेष नैपुण्य मिळविले आहे, अशा सभासद व त्यांच्या पाल्यांची माहिती दिनांक २६/०६/२०२५ रोजीपर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात सादर करावी, म्हणजे त्यांचे वार्षिक सर्वसाधारण सभेत कौतुक करणे शक्य होईल.**

९) ज्या सभासदांना त्यांचे ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक बँकेकडे ई-मेलव्दारे रजिस्टर करावयाचे असतील, त्यांनी फक्त headoffice@sampadabank.com या ई-मेल आयडी वर दिनांक २६/०६/२०२५ पर्यत सदर माहिती पाठवावी.

१०) जाहीर झालेला लाभांश जमा करण्यासाठी आपल्या बँकेच्या कोणत्याही शाखेत बचत खाते उघडावे, म्हणजे लाभांश रक्कम त्वरित जमा करणे शक्य होईल.